CAREERINDIA

**Code No. 07**

Total No. of Questions : 74 ] [ Total No. of Printed Pages : 4

**March, 2009**

# MARATHI

Time : 3 Hours 15 Minutes ] [ Max. Marks : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) विज्ञान: एक वरदान

2) ग्रंथ हेच गुरू

3) आईची माया

4) खेळांचे महत्व

5) फॅशन: एक फॅड.

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) राऊळामुळे दोन्ही बाजूच्या सैन्यामध्ये आपापसात काय घडले ?

7) कोणत्या झाडाना हात लावू दिला जात नव्हता ?

8) साने गुरूजींची जगाकडे पाहाण्याची दृष्टी कशी होती ?

9) अजिंठा, वेरूळसारख्या कलाकृती कोणी निर्माण केल्या ?

10) लेखक स्वत:ची हौस भागविण्याखातर काय करतो ?

11) निवेदकाला आठ तासाची ड्युटी कशाकरिता हवी होती ?

12) सेवक जखमींना कोणाकडे पाठवत होते ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) 'राऊळ माय: राऊळ बापु' कथा तुमच्या शब्दात लिहा.

14) जीवनाकडे पाहाण्याचा साने गुरूजींचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

15) महाविद्यालयाबाबत काही मंडळींचा ग्रह कोणता ? लेखक यशवंतराव चव्हाणांनी तो कशाप्रकारे खोडून काढला आहे.

[ Turn over

www.careerindia.com

CAREERINDIA



क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) फाल्गुनरावाचे स्वभाव-चित्रण.

17) आंबेडकर मास्तर.

18) संत वेमन्ना व तुकाराम यांच्या अभंगातील साम्य.

19) सूर्यास्तानंतरच्या युद्धभूमीवरील वातावरण.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चे ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) ''रयतांनी ही झाडे लावून लेकरासारखी बहूतकाळ जतन करून वाढविली.''

21) ''पश्चाताप वाटतोय काय, तुमची पापे आठवतात काय, दुसऱ्याचे ऋणी आहात काय.''

22) ''आता इथ पाहिजे तेवढा आराम करा'' अस म्हटल, तेंव्हा शरिराने आणि मणात दोघांनीही ती सूचना स्वीकारली.

23) ''आता तू इथ येऊ नकोस. मालकांना समजल, तर आम्हालाही जेलची हवा खावी लागेल ..........................''

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

24) 'परिस' म्हणजे काय ?

25) भाग्यपुरुष कोणाला म्हटले आहे ?

26) आयुष्य वितळून सोन्याचा घड ओतणारे कोण आहेत ?

27) आपली पुरातन संस्कृती कशी आहे ?

28) कुणाबरोबर खेळ मांडून गावे असे कवी म्हणतो ?

29) अनोळखी पत्ते शोधून काढण्यासाठी निवेदक काय धुंडाळतो ?

30) ससे पदरात टाकताना कोणती जाणीव करून देण्यात आली.

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) श्रीकृष्ण व रूक्मिणी यांच्या विवाहप्रसंगाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

32) 'ठरविते किती मी' कवितेचे रसग्रहण करा.

33) कवी नारायण सूर्वे यांनी एक नव्या संघर्षात' या कवीतेत कोणता संदेश दिला आहे ?

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

34) समर्थ रामदासांनी सांगितलेली चातुर्यलक्षणे कोणती.

35) 'कुणी मारावे कुणी मरावे' कवितेतील आशावाद.

36) स्तब्ध, तृप्त पाणी असणारे तळे.

37) 'तणकट' कवितेतील नायकाची समस्या.

www.careerindia.com

CAREERINDIA



ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा : 2 × 3 = 6

38) ज्ञानी तो कोण विज्ञानी तो कोण ।
दोहींच्या आपण साक्षीभूत ॥

39) 'दऱ्या खोऱ्यात रानात
लाट तेजाची वाहते'.

40) 'गुंतलेले प्राण हया रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे'

41) 'तपासला पुन:पुन्हा
माझ्या गतायुष्यातला हिशोब
निरर्थक'

IV. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : 2 × 5 = 10

42) पोपट या लहानग्याच्या वेदनेचे स्वरूप स्पष्ट करा.

43) बकसचे व्यक्तिचित्रण करा.

44) 'कलिंगड' मधील आईचे व्यक्तिचित्रण रेखाटा.

45) झिप्री मुलगी ते नायिका पर्यंतचा तीच्या जीवनाचे थोडक्यात वर्णन करा.

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर बातमी तयार करा : 1 × 5 = 5

46) पाणी पुरवठा नियमितपणे व्हावा या करिता निघालेला महिलांचा मोर्चा.

47) महेंन्द्र सिंह धोनीला 'भारतरत्न' पुरस्कार मिळाला.

48) अतिरेक्यांचा मुंबईवर हल्ला.

ब) कंसातील सूचने प्रमाणे प्रश्न सोडवा. 5 × 1 = 5

49) ( वडील ) पाठविलेल्या पैशाचे आम्ही कपडे घेतले ( कंसातील शब्दाचे सामान्य रूप करा )

50) मी गावाला जात आहे. ( काळ ओळखा )

51) रेखा अभ्यास करते ( काळ ओळखा )

52) धर्म, शांत ( विरुद्धार्थी शब्द लिहा )

53) तु समारंभाला उशीरा आलास ( अर्थ न बदलता नकारात्मक करा ).

क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 5 × 1 = 5

54) श्री गणेशा लिहिला जाणे.

55) डोळे उघडणे.

56) आपलेच गुऱ्हाळ लावणे.

57) मन वळविणे.

58) पायमल्ली करणे.



www.careerindia.com

CAREERINDIA



ड) खालील रूढ इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

59) कारटून्स

60) आऊटडोअर शुटिंग

61) हेडलाईन

62) इन्सपेक्टर

63) सॅटेलाइट.

इ) खालील अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा : 5 × 1 = 5

64) सोलापूरला आमचा कोणी कार्यकर्ता नव्हता.

65) विनोबांनी खूप पदयात्रा केल्या.

66) तुकारामांनी अभंगाची रचना केली.

67) भारतवासीयानों संकटग्रस्तांना मदत करा.

68) अमेरिकेहून इंग्लंड जवळ आहे.

VI. उतारा वाचून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

मुले अधूनमधून खोटे बोलायचीच अजूनही बोलतात : बदल असेल तर तो खोटे बोलण्याच्या हेतूमध्ये आहे. एवठेच लहाणपणी ती मार चुकवायला खोटे बोलत असतील, तर आता कुमारवयात एखादा आळ चुकवायला खोटे बोलतात, तेंव्हा एकादेवेळेस स्वत:चा निष्पापपणा सिद्ध करायला खोटे बोलत असतील, तर आता आपले खाजगीपण किंवा प्रायव्हसी सिद्ध करायला खोटे बोलून जातील. म्हणजे दरवळणावर कमी अधिक खोटे आहेच. खरे बोलायचे तर अधूनमधून मुलांनी खोटे बोलणे आवश्यकच आहे. त्यांच्यावर नाना अडचणी येत असतात. नेमके क्लासच्या वेळात टी० व्ही० वाले चांगला सिनेमा दाखवायला निघाले की, क्लास बुडवताना खोट्यांचा आधार लागतो. शाळेत आपल्या हातून प्रयोग करताना टैस्टट्यूब फुटली आहे हे घरी कळू दयायचे नसते. पुढची पीढी ही सर्वच बाबतीत पुढची. त्यामुळे स्वत:ला हवे ते करणारच आहे. वाढते स्वातंत्र्य, वाढती प्रलोभने यामध्ये सत्याची पीछेहाट होणारच आहे. पालकांनी ती कशी स्वीकारावी हे कळणे ही काळाची गरज आहे.

69) सर्व मुलांमधील कोणते सत्य लेखिकेने सांगितले आहे ?

70) लहानपणी मुले कोणत्या कारणास्तव खोटे बोलतात ?

71) कुमारवयातील मुले कोणत्या कारणास्तव खोटे बोलतात ?

72) 'सत्याची पीछेहाट होणारच' असे लेखिका का म्हणते ?

73) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

**किंवा**

74) तुमच्या वर्गाची सहल म्हैसूरला जाणार आहे त्यासाठी बस मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यास पत्र लिहा.

www.careerindia.com